प्रति,

मा. प्राचार्य,

तुळजाराम चतुरचंद कला, विज्ञान

व वाणिज्य महाविद्यालय, बारामती - ४१३१०२

**विषय:- कार्यशाळेचा अहवाल.**

महोदय,

उपरोक्त विषयान्वये, आपणांस अहवाल सादर करण्यात येतो की, सोमवार दि. ०७ मार्च, २०२२ रोजी कार्यशाळेच्या निमित्ताने भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवा निमित्त "आझादी का अमृत महोत्सव" या उपक्रमा अंतर्गत तुळजाराम चतुरचंद्र महाविद्यालयातील राज्यशास्त्र विभागाच्या आणि उद्योजकता विकास केंद्र वतीने " ऑनलाईन कार्यशाळेचे आयोजन" दि. ७ मार्च २०२२ रोजी "राज्यशास्त्र विषयातील : संधी" या विषयावर ऑनलाईन व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. रमेश शेवाळे, सर राज्यशास्त्र विभाग प्रमुख, संत मुक्ताबाई महाविद्यालय, ता. मुक्ताईनगर जि. जळगाव. यांनी मार्गदर्शन केले. तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राज्यशास्त्र विभागप्रमुख डॉ. हनुमंत फाटक सर उपस्थित होते.

या व्याख्यानाचा प्रारंभ सकाळी ११:३० वा. ऑनलाईन पध्दतीने करण्यात आला. डॉ. रमेश शेवाळे,सर यांनी राज्यशास्त्र या विषयाची सामाजिक शास्त्रांतील परिषभा सांगून आपल्या व्याख्यानाला प्रारंभ केला. नंतर राज्यशास्त्र विषयाचे महत्व विध्यार्थीसामोरे मांडले आणि राज्यशास्त्र विषयाची व्याप्ती स्पष्ट केली. याचबरोबर राज्यशास्त्रा विषयातील नवनवीन संधींचा परिचय सरानी करून दिला .

यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राज्यशास्त्र विभागप्रमुख डॉ. हनुमंत फाटक सर उपस्थित होते. आपल्या अध्यक्षीय भाषणात डॉ. हनुमंत फाटक सर म्हणाले की, राज्यशास्त्रा विषयातील होणारे बदल आणि त्याच बरोबरीने बदलणाऱ्या नोकरीच्या संधी बद्दल सरांनी मार्गदर्शन केले.

या व्याख्यानाला विध्यार्थी व प्राध्यापक उपस्थित होते. हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी मा. प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरूमकर सर, राज्यशास्त्र विभागप्रमुख डॉ. हनुमंत फाटक सर, उपप्राचार्य डॉ. अविनाश जगताप सर, डॉ. अजित तेलवे सर, उपप्रचार्य डॉ. जगदिश देशपांडे सर, उपप्रचार्य डॉ. रामचंद्र सपकळ सर, उपप्रचार्य डॉ. सीमा नाईक गोसावी मॅडम, उपप्रचार्य डॉ. योगिनी मुळे मॅडम, महाविद्यालयाचे रजिस्टार श्री. अभिनंदन शहा सर, उधोजकता विकास केंद्र प्रमुख डॉ. विकास काकडे, प्रा. दीपाली अनपट, उधोजकता विकास कलाशाखा समनव्यक डॉ. सुहास राऊत यांनी मार्गदर्शन आणि सहकार्य केले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक, पाहुण्यांचे स्वागत व परिचय डॉ. कैलास मांटे यांनी केले. तर आभार प्रा. राजू पांडे यांनी मांनले.

Noted ABS | Copy IQAC

24.3